# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १९ ऑक्टोबर २०२६


## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून बीडमधील दुष्काळी परिस्थितीचा आढावा




**बीड (भगवंत पाळवदे) :** पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीचा तसेच प्रशासकीय उपाययोजनांचा सविस्तर आढावा राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला. या बैठकीस आमदार प्रकाश सोळुंके, आमदार धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.सध्या पावसाअभावी शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक करपले असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पीक नुकसानाचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. बहुतांश पंचनामे पूर्ण होत आले असून अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील कार्यवाही गतिमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच पीक विमा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणि अचूकता राखण्याचे निर्देश संबंधित कृषी व महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आले.यावेळी पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दुष्काळ आणि टंचाईच्या काळात नागरिकांनी अनावश्यक खर्च टाळावा, लग्न आणि वाढदिवसांवरील खर्च टाळावा तसेच सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करावे, असे आवाहन केले.पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून सध्या सुरू असलेल्या पाण्याच्या टँकरवर जीपीएस (GPS) प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यात सध्या २२५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पिण्यायोग्य पाण्याचा वापर कोणत्याही परिस्थितीत बांधकामासाठी करू नये आणि पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, असेही स्पष्ट करण्यात आले. याशिवाय जलस्त्रोतांचे पुनर्भरण, नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि विहिरींची दुरुस्ती यांसारखी जलसंवर्धनाची कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केल्या.जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच पूर्वनियोजन करावे आणि शेतकऱ्यांना मुरघास, हायड्रोपोनिक्स तसेच अझोला चारा उत्पादनाचे प्रशिक्षण द्यावे, असे बैठकीत सांगण्यात आले. वीबी-जी रामजी योजनेअंतर्गत रोजगार हमीची कामे जलसंवर्धनाशी जोडून प्रभावीपणे राबवावीत, जेणेकरून ग्रामीण भागातील शेतकरी आणि मजुरांना स्थानिक पातळीवरच हक्काचा रोजगार उपलब्ध होईल आणि त्यांच्यावर स्थलांतराची वेळ येणार नाही.परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या मुख्यालयी थांबून नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी, तसेच शेतकऱ्यांशी संवाद वाढवून त्यांचे समुपदेशन करावे आणि त्यांना मानसिक आधार द्यावा, अशा सूचना देण्यात आल्या. पाणी, चारा आणि रोजगारनिर्मिती या सर्व बाबींवर समन्वयाने काम करून नागरिकांना तातडीने दिलासा देण्यासाठी प्रभावी नियोजन करावे, असेही आढावा बैठकीत स्पष्ट करण्यात आले. वाढत्या दुष्काळी संकटात शासन आणि प्रशासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून सर्व उपाययोजना युद्धपातळीवर राबविल्या जात आहेत.शेतकरी बांधवांना या नैसर्गिक संकटातून सुखरूप बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना तातडीने सावरण्यासाठी राज्य शासन सर्व स्तरांवर उपाययोजना करत असून प्रशासन पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या

## मगबूलखान पठाण यांना लोकप्रशासन विषयात पीएच.डी. प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** येथील मगबूलखान पठाण यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे लोकप्रशासन या विषयात पीएच.डी. (Ph.D.) पदवी प्रदान केली. मगबूलखान पठाण यांनी "मुस्लिम समुदायाचे सामाजिक समावेशन आणि लोकप्रशासनातील सहभाग : महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात विशेष अभ्यास" या विषयावरील शोध प्रबंध प्रा. (डॉ.) श्याम शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल लोकप्रशासन विषयाचे विभाग प्रमुख प्रा. (डॉ.) श्याम शिरसाठ, प्रा. डॉ. ज्योती धायगुडे मॅडम, प्रा. डॉ. भास्कर पठाडे, प्रा. डॉ. संतोष काकडे यांनी अभिनंदन केले. तसेच परिवार, मित्र आणि नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## नवरात्रोत्सवात नवदुर्गांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करून केला वाचन प्रेरणा दिन साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयात नवरात्रोत्सवात नवदुर्गांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करून गुरुवारी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 15 ऑक्टोबर रोजी सर्वत्र वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो.सकाळी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी दोन तास सामूहिक पुस्तक वाचन केले. त्यानंतर अधिक मासानिमित्त लोकसहभागातून खरेदी केलेल्या ग्रंथांचे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन नवरात्रोत्सवनिमित्त नवदुर्गांच्या हस्ते करण्यात आले. मनीषा चवडे, अर्चना भागवत, निशा लांडगे, जयश्री लांडगे, मीना पालंबे, उन्नती पुंड रा.बोरी,मंगल सांगोले,निर्मला भाजीभाकरे ,पिंकी तांबुरे रा. लातूर, सुनीता कुरकुट रा. परळी वैजनाथ यांची यावेळी उपस्थिती होती. उपस्थित सर्व महिलांचा यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष पवन ओझा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अर्णव साबळे, श्रेयस चिंधे, रुद्र राऊत, आर्यन राऊत, प्रकाश राऊत ,कृष्णा काळे, कृष्णा नरवडे, श्रेया गायकवाड, आरोही गायकवाड ,कार्तिक गायकवाड, सुवर्णा भिसे व पूनम भिसे यांनी दोन तास पुस्तक वाचन करून डॉ. कलाम यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण केली.वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी प्रास्ताविकातून डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावर मार्गदर्शन करून कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचेआभार व्यक्त केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002